
2018 - 2019


Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume-VIII, Issue-I

January - March - 2019

Marathi Part - III

IMPACT FACTOR/ INDEXING

2018 - 5.5

www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | स्त्री - पुरुष समानतेच्या संदर्भातील आचार्य दादा धर्माधिकारी यांचे विचार<br>प्रा. डॉ. गोविंद मा. तिरमनवार | १२४-१२६ |
| २८ | सामाजिक परिवर्तन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. विनय आठवले | १२७-१२८ |
| २९ | आदिवासी चळवळीमध्ये बिरसा मुंडा यांच्या कार्याचे चिकित्सक अध्ययन<br>डॉ. मनिषा यादव<br>डॉ. ममता पाथ्रीकर | १२९-१३१ |
| ३० | बदलत्या तापमानाचा सागरजलावरिल परिणाम व पाण्यातील सजीवांनसमोर निर्माण होणाऱ्या समस्या<br>प्रा. योगेश्वर बलिंगे | १३२-१३४ |
| ३१ | सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य<br>प्रा. डॉ. मंजुषा ह. थापुडकर | १३५-१३९ |
| ३२ | अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक योगदान<br>प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे | १४०-१४२ |
| ३३ | आधुनिक राजकीय विचारवंतांची राजकीय सुधारणामधील भुमिका<br>डॉ. ए. डी. जाधव | १४३-१४६ |
| ३४ | डॉ. नरेन्द्र दाभोलकरांचे सामाजिक योगदान<br>डॉ. श्रध्दा थोरात | १४७-१५२ |
| ३५ | थोर साहित्यकार महात्मा फुले यांचे सामाजिक योगदान !<br>प्रा. रेखा अढाव | १५३-१५५ |
| ३६ | संगीत आणि भारतीय समाज<br>डॉ. वैशाली देशमुख | १५६-१५७ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २७. स्त्री – पुरूष समानतेच्या संदर्भातील आचार्य दादा धर्माधिकारी यांचे विचार

**प्रा. डॉ. गोविंद मा. तिरमनवार**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

**प्रस्तावना**

सामाजिक विषमता दूर करून समता प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांनी व समाजसुधारकांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. विचारवंतांच्या सुधारणावादी विचारांमुळे व कार्यामुळे महाराष्ट्रातील समाजात शेकडो वर्षापासून दृढ झालेली सामाजिक विषमता संपूर्ण समतेची नवी पहाट उगविली. महाराष्ट्र समाजसुधारकांची व विचारवंताची भूमी होय. या भूमीत अनेक विचारवंतानी सुधारणावादी व पुरोगामी विचार पेरले. महाराष्ट्रातील सुधारणावादी विचारपरंपरेतील एक विचारवंत म्हणजे आचार्य दादा धर्माधिकारी हे होय. दादा धर्माधिकारी यांनी स्त्री पुरूष समानते संदर्भात आणि स्त्री स्वातंत्र्य संदर्भात अत्यंत पुरोगामी विचार मांडले.

आचार्य दादा धर्माधिकारी हे एक सक्रिय स्वातंत्र्य सेनानी, समाजसेवक, विचारयोगी, प्रबोधनकार, दिशादिग्दर्शक, गांधीवादी विचारांनी प्रभावित असे सर्वोदयी व्यक्तीमत्व होते. त्यांचा जन्म १८ जून १८९९ रोजी मुळतापी या गावी झाला. त्यांचे मुळ नाव शंकर त्र्यंबक धर्माधिकारी असे होते. मुळतापी हे गाव मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यात असलेले तालुक्याचे गाव मुलताई या नावाने ओळखले जाते. दादा धर्माधिकारी यांचे कुटुंब सनातनी रूढीप्रिय परंतु शास्त्रप्रवण स्वरूपाचे होते. कुटुंबातील सदस्यगण म्हणजे दादांचे वडील व आजोबा अध्यात्मिक प्रवृत्तीचे असून राष्ट्रीय चळवळीने प्रभावित होते. दादांच्या प्राथमिक शिक्षणाची सुरवात इ.स. १९१० मध्ये रहेली येथील शाळेत झाली. माध्यमिक शिक्षण हे होशंगाबाद येथे झाले. दादांना लहानपणापासून वाचनाची आवड असल्याने कार्ल मार्क्स, महात्मा गांधी व इतर थोर पुरूषांची पुस्तके वाचत असल्याने त्यांच्यातील क्रांतिकारी वैचारिक शक्तीला चालना मिळाली. पुढे नागपूरात महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक विचारांनी प्रभावित होवून, त्यांनी शिक्षणाचा त्याग केला व राष्ट्रीय आंदोलनात प्रवेश केला.

आचार्य दादा धर्माधिकारी यांचे बालसंगोपन एक सनातनी व रूढीप्रिय विचारपरंपरेतील कुटुंबात झाले असले तरी कालांतराने वैचारिक मंथनामुळे त्यांचे मत सुधारणावादी होवू लागले. दादांनी समाजातील जिवंत व प्रचलित प्रश्नाविषयी विशेषत: स्त्री शिक्षण विषयक स्वातंत्र्याच्या व समानतेच्या तत्वजिज्ञासेच्या दृष्टिने विचारमंथन करून आपले निष्कर्ष नम्रपणे समाजासमोर सादर केले.

दादांच्या मनात लहानपणापासून स्त्रियांबद्दल एक विशेष सहानुभूती व आदरपूर्ण आस्था निर्माण झालेली होती. कुटुंबात व समाजात स्त्रियांना देण्यात येणारी निम्न, गौण व अपमानास्पद स्वरूपाची वागणूक दादांना कधीही सहन होत नसे. त्यामुळे दादांनी स्त्रियांच्या सामाजिक दर्जाबद्दल विचार मंथन सुरू केले.

कुठल्याही धर्माचा किंवा देशाचा इतिहास बघितला तर आपणास असे दिसते की, स्त्रियांना त्या त्या देशांनी किंवा राजा महाराजांनी गौण वागणूक दिलेली दिसते. राम रावणाच्या युध्दाचे कारण सीताच असलेली दिसते तर महाभारतातेही कारण द्रौपदीच असल्याचे सांगतांना प्रसिध्द कवी गिरधरजी म्हणतात, ''कौरव–पांडव वंशको किया द्रौपदी नाश'', अशी पुष्टी जोडतात. तेव्हा स्त्रीला ही समानतेची वागणूक प्राचीन काळापासून मिळाली नाही पण आधुनिक काळातही स्त्री ही उपेक्षितच असल्याचे नरहर कुरूंदकर सांगतांना म्हणतात, ''स्त्री समाजात स्वतंत्र असली पाहिजे असे मी मानतो. त्याचे कारण स्त्री ही स्त्री आहे हे नव्हे, स्त्री ही स्त्री आहे म्हणून ती स्वतंत्र असली पाहिजे हा मुद्दा आहे. स्वतंत्र असणे हा माणसाचा हक्क आहे. पुरूष हा पुरूष आहे म्हणून नव्हे तर माणूस आहे म्हणून स्वातंत्र्याचा हक्कदार होतो. स्त्रीयांना सुध्दा स्त्री असल्यामुळे नव्हे, तर माणूस असल्यामुळे स्वतंत्र्य असण्याचा हक्क आहे असे मी मानतो.''[४] त्याच पध्दतीची भूमिका ही आचार्य दादा धर्माधिकारीं मांडताना दिसतात. दादा म्हणतात, ''पुरूष हा जोपर्यंत पुरूष आणि स्त्री ही जोपर्यंत स्त्री राहील, तोपर्यंत दोघांच्याही हातून समाजाचा उद्धार होणे शक्य नाही. पुरूषांचे पुरूषत्व आणि स्त्रीचे स्त्रीत्व ही एकमेकांत मिसळून संपूर्ण व संवादी मानव्य जेव्हा सिध्द होईल तेव्हाच ती आत्मसत्ता होईल. या संवादी मानव्यांचे अधिष्ठान म्हणजे आत्म्याची सत्ता.''[५] अशाप्रकारचा स्त्री पुरूषांच्या आत्म्यांच्या संवाद हा एकजीव होवून झाला पाहिजे हा नवा विचार ते मांडतात. कारण भक्त जसा परमेश्वराच्या रूपात मंत्रमुग्ध होवून एकरूप होवून जातो तशाचप्रकारे स्त्री पुरूषांनी एकमेकांत एकरूप होवून गेले पाहिजे. त्यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठाची भावनाच उरणार नाही म्हणजे खऱ्या अर्थाने एका आत्म्याचा संवाद हा दुसऱ्या आत्म्याशी होवून जाईल आणि तेव्हा कुठे समाजात खऱ्या अर्थाने समानता निर्माण होईल. हा आशय दादा धर्माधिकारी आपल्या विचारातून स्पष्ट करतात.

त्याचसोबत ते स्त्रीला धर्मविश्वाही एक व्यक्ती म्हणून मान्यता दिली पाहिजे असा विचार मांडतात. त्यासाठी ख्रिश्चन, हिंदू, मुसलमान, पारशी इत्यादी धर्मांवर वक्तव्य करतांना म्हणतात, ''वास्तविक धर्माने सवलत ठेवायची तर ती उभयपक्षी ठेवायला हवी होती, पण तसे झालेले नाही कारण स्त्रीची भूमिका धर्मात गौण मानली गेली आहे. विवाहतही भूमिका गौण असता कामा नये. स्त्री आणि पुरूष यांची भूमिका समान असली पाहिजे तरच तो विवाह, एरवी विवाह नव्हे, मग तो हिंदू पध्दतीने झालेला असो किंवा मुसलमान पध्दतीने झालेला असो.''[६]

अशाप्रकारे विविध धर्मावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून स्त्रियांना समानतेची वागणूक धर्मांच्याही माध्यमातून मिळाली पाहिजे हया मतांचा आचार्य दादा धर्माधिकारी पुरस्कार करतात. स्त्रियांच्या ब्रम्हचर्याचा पुरस्कार करतांना आचार्य दादा धर्माधिकारी म्हणतात, ''पुरूषांच्या जीवनात ब्रम्हचर्याचा जो महिमा आहे, तोच

स्त्रीजीवनात असायला पाहिजे. जी स्त्री ब्रम्हचरिणी राहील ती एखाद्या ब्रम्हचाऱ्या पुरूषाइतकीच श्रेष्ठ मानली गेली पाहिजे. समाजात अविवाहीत पुरूषांचे आणि अविवाहीत स्त्रीचे स्थान समान असले पाहिजे''[४] या संदर्भातील मत त्यांनी मध्यप्रांत व वऱ्हाड विधानसभेतही मांडले होते.

त्याचसोबत आचार्य दादा धर्माधिकारी यांनी स्त्रियांना समान वारसा हक्क प्राप्त व्हावा यासाठी सुध्दा भूमिका घेतलेली दिसते. ते म्हणतात, ''स्त्री पुरूषांच्या समान भूमिकेच्या संदर्भात दुसरा प्रश्न वारसाचा हक्क आहे या प्रश्नाची दोन अंगे आहेत. एक पैलू संपत्तीच्या वारसाचा आहे आणि दुसरा पैलू वंशपरंपरेच्या उत्तराधिकाराचा आहे. या उत्तराधिकाराला पिंडोदक क्रियेच्या अधिकाराचा संबंध पारलौकिक जीवनाशी आहे. वंशाचा उच्छेद होवु नये, ज्यातून अविच्छिन्न राहावा हा विचार देखील कुळ परंपरेच्या आग्रहाचा परिणाम आहे. कुलिनतेची भावना पुढे वंशवादात आणि वंशसंघर्षात परिणत झाली. आजचा काळा गोरा वाद या वंशवादाचेच अपत्य आहे. तेव्हा प्रश्नाचा विचार मानव्याच्या दृष्टिनेच करावा लागेल आणि संभाव्यता अशी आहे की, रक्तशुध्दीच्या व वर्णसंकराच्या विषयी परंपरागत भावनाचा परित्यागही करावा लागेल.''[५]

अशाप्रकारे आचार्य दादा धर्माधिकारी स्त्रियांना व्यापक प्रमाणात समान हक्क प्राप्त व्हावे याचा पुरस्कार करताना दिसतात. स्त्रीला समाजात एक व्यक्ती वा नागरिक म्हणून सुध्दा दर्जा मिळावा ह्या मतांचा पुरोगामी विचार ते मांडतात. दादांच्या मते स्त्री पुरूष समानता म्हणजे सारखेपणा नव्हे, स्त्रीने पुरूषांची व पुरूषाने स्त्रीची जागा घेणे नव्हे, तर स्त्री पुरूष समबळ व समतुल्य ठरणे हाच हा मुल्यपरिवर्तनाचा प्रश्न आहे. त्यासाठी स्त्रियांनी आत्मबळ व मनोबळाचा प्रयोग करून जुन्या संस्काराची पाळेमुळे खोदून काढून नव्या संस्काराचे बिजारोपण करावे. समाजात प्रतिष्ठा मिळविणे ही जीवनाची अंतिम आघाडी आहे. असा विचार दादा धर्माधिकारी मांडतात.

एकुणच आचार्य दादा धर्माधिकारी यांनी स्त्री स्वातंत्र, उन्नती आणि स्त्री पुरूष समानतेच्या दृष्टिने विचार मंथन करून आपले निष्कर्ष नम्रपणे समाजासमोर मांडले आणि समाजाला विचार करण्यास भाग पाडले. स्त्री पुरूष समानतेच्या संदर्भात आचार्य दादा धर्माधिकारी यांनी मांडलेले विचार ऐतिहासिकदृष्टीने महत्त्वाचे होते.

**संदर्भ**

१. पराग चोळकर (संपा), साम्ययोग; (विशेषांक), ३० जानेवारी १९९९, पृ. ६९.
२. किता पृ. ७३.
३. दादा धर्माधिकारी, तरूणाई ; मंजुल प्रकाशन; पुणे २०१३, पृ. १६३.
४. तारा धर्माधिकारी, दिशादर्शक भाषणे ; हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २००३, पृ. ९१.
५. दादा धर्माधिकारी, आशा उद्याची ; सेतुश्री प्रकाशन, अमळनेर, १९८९, पृ. ८४.